# राजर्षी शाहूंचे कोल्हापूरच्या वृत्तपत्र विकासामधील योगदान : एक चिकित्सा

**Dr Dhiraj Suresh Shinde** Head, Dept of History Smt ARP Kanya Mahavidyalaya Ichalkaranji, Kolhapur **Email id**: dhirajshinde2239@gmail.com **Mobile no:** 8888444123

---

**गोषवारा :**

वृत्तपत्रे आजच्या लोकशाही शासन प्रणालीमध्ये "Forth estate of the Kingdom" म्हणून ओळखली जातात. आधुनिक काळामध्ये वृत्तपत्रास प्राप्त झालेले स्थान हे मुद्रणकलेच्या शोधामुळे त्याचा टप्याटप्याने विस्तार झाला.भारतामध्ये परकियांच्या आगमनानंतर मुद्रणकला आली आणि वृत्तपत्राचाही विकास घडून आला.भारतामधील पहिले वर्तमानपत्र जेम्स ऑगस्टस हिकी याने २९ जाने १७८० रोजी "बेंगाल गॅझेट"या नावाने साप्ताहिक स्वरुपात सुरु केले.त्यानंतर प्रांतपरत्वे वृत्तपत्रे विकसित झाली.मुंबई आणि पुण्यानंतर कोल्हापूरमध्ये वृत्तपत्रांचा विकास राजर्षी शाहूंच्या प्रेरणेने झाला.शाहू महाराजांना माहित होते कि,वर्तमानपत्रामध्ये समाजाला बदलण्याचे प्रचंड सामर्थ्य असलेने ते केवळ उच्चवर्गाची मक्तेदारी होता कामा नये.समाजातील सर्वसामान्यांनाही त्याचा लाभ व्हावा,अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती.छत्रपती शाहुंनी बहुजन वर्गामधून वृत्तपत्राचा व्याप समर्थपणे सांभाळणारे तरुण निर्माण झाले पाहिजेत या विचाराने त्यांनी स्वतःमुंबईच्या इंदुप्रकाश दैनिकाच्या कचेरीमध्ये जावून एका तरुणास वृत्तपत्र प्रशिक्षण कार्यास सहाय्य केले.तो तरुण म्हणजे 'विजयी मराठा' साप्ताहिकाचे संपादक श्री भुजंग कृष्णाजी गायकवाड होय.त्यांच्या दूरदृष्टीने कोल्हापूरमध्ये पुरोगामी वृत्तपत्राची एक चळवळ निर्माण होण्यास प्रेरणा मिळाली.त्यामधून इ.स १९०१ ते इ.स १९२२ या काळात जवळपास विसपेक्षा ज्यादा विषयांवर साप्ताहिके,पाक्षिके निर्माण झाली.आणि समाजातील अनेक जातींच्या लोकांमधून चालवली गेली. शाहू महाराज यांच्या कालखंडामध्ये कोल्हापूरात राजकीय,सामाजिक,धार्मिक,शैक्षणिक,औद्योगिक,कृषिविषयक,बौद्धिक असे घटक वृत्तपत्रे हाताळत आणि त्याआधारे समाजजागृती करत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या निधनानंतर त्यांचे लोककल्याणकारी कार्य त्यांचे चिरंजीव छत्रपती राजाराम महाराज यांनी चालू ठेवले.त्यामुळे कोल्हापूर संस्थानामध्ये पुरोगामी वृत्तपत्रांची वाटचाल सुरु राहिली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरआधुनिकीकरणामुळे कोल्हापूरच्या वृत्तपत्रांचा गुणात्मक आणि संख्यात्मक दर्जा उंचावला.

**प्रस्तावना :**

वृत्तपत्रे आजच्या लोकशाही शासन प्रणालीमध्ये "Forth estate of the Kingdom" म्हणून ओळखली जातात.कारण वृत्तपत्रामधून प्रगट होणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या प्रतिबिंबामुळे होय.आधुनिक काळामध्ये वृत्तपत्रास प्राप्त झालेले स्थान हे मुद्रणकलेच्या शोधामुळे प्राप्त झालेने 'वृत्तपत्र संस्थेची जन्मदात्री' म्हणून मुद्रणकलेचा उल्लेख करणे आवश्यक आहे. युरोपमध्ये छापखाण्याचा शोध लागुन त्याचा टप्याटप्याने विस्तार झाला.भारतामध्ये परकियांच्या आगमनानंतर मुद्रणकला आली आणि वृत्तपत्राचाही विकास घडून आला.पोर्तुगीजांनी भारतामध्ये सर्वप्रथम इ.स १५५० मध्ये गोव्यामध्ये छापखाना आणला.जुवाव दे वस्तुमांती हा भारतामधील पहिला मुद्रक होय.[१]भारतामधील पहिले वर्तमानपत्र जेम्स ऑगस्टस हिकी याने २९ जाने १७८० रोजी "बेंगाल गॅझेट" (Bengal Gazette) किंवा "कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर" (Calcutta General Advertiser) या नावाने साप्ताहिक स्वरुपात सुरु केले.[२]

भारतात पुढे अनेक प्रांतात स्थानिक भाषेत वृत्तपत्रे विकसित झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी भाषिक जनता ही मुंबई प्रांत, निजामाचा प्रांत आणि मध्य प्रांत अशी विखुरली गेली होती. या प्रांतांमध्ये तेथील स्थानिक परिस्थिती, प्रश्न, घडामोडी यातून वृत्तपत्रे विकसित झाली. मुंबई प्रांतात मुंबई आणि पुण्यानंतर कोल्हापूर संस्थानांत वृत्तपत्रांचा विकास घडून आला.

**मुंबईमधील वृत्तपत्राचे कॉस्मोपॉलिटिन स्वरूप :**

हिंदुस्थानात प्रादेशिक वृत्तपत्रांची वाढ होत असताना त्याचा प्रथम विस्तार बंगाल प्रांतात झाला.त्यानंतर मुंबई प्रांतात झाला. तरी मुंबईमध्ये मराठीऐवजी गुजराथी वृत्तपत्राच्या आरंभानंतर मराठी वृत्तपत्रांची वाटचाल सुरु झाली. गुजराथी वृत्तपत्र मुंबईत निघण्याचे कारण म्हणजे मुंबईतील मुद्रणाच्या सोयी व त्यात पारसी समाजाने आघाडी घेतली होती. शिक्षणातही पारसी समाज आघाडीवर होता वा त्यांनी गुजराथी ही आपली स्वभाषा स्वीकारली होती. वृत्तपत्रांसाठी आवश्यक साक्षरांचा वर्ग मुंबईत मुबलक होता. तसेच त्यातून गुजराथी वृत्तपत्रांच्या निर्मितीनंतर मराठी वृत्तपत्रही मुंबईतच निघणे अपरिहार्य होते. पुणे जरी सांस्कृतीक राजधानी असली, तरी जुन्या परंपरागत कल्पनांचा पगडा त्यावेळी पुण्यावर होता. याउलट मुंबई हे चहुबाजूने मराठी मुलुखाने वेढले असूनही त्या शहरावर पाश्चात्य संस्कृतीची छाप ही सुरवातीपासून

राहिली.मुंबईचे केवळ मराठी स्वरूप न राहता त्याला मिश्र संस्कृतीचे स्वरूप प्राप्त झाले. एक व्यापारी शहर म्हणूनमुंबई विकसित होत गेल्याने अशा शहरातील लोक नवीन गोष्टी चटकन स्वीकारतात.शिक्षणाच्या वाढत्या व्यापकतेमुळे गुजराथीप्रमाणे वृत्तपत्रासारखी साधने आपण निर्माण करावी,अशी इच्छा मुंबईतील मराठी समाजात निर्माण होऊ लागली. मुंबईच्या 'कॉस्मोपॉलिटिन' स्वरूपामुळे हिंदू, मुस्लीम, ख्रिस्ती, गुजराथी असे अनेक धर्मांचे, जातीचे लोक एकत्र आले. इ.स. १८७० पर्यंत महाराष्ट्राच्या शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक सुधारणांच्या चळवळीचे 'मुंबई' केंद्र राहिले.[३]

**पुण्यातील वृत्तपत्रांची वाटचाल :**

मराठी वृत्तपत्रांची सुरवातीची वाटचाल मुंबईनंतर पुण्यात गतीने झाली. इ.स. १८१८ ला पेशवाई नष्ट झाल्यानंतरही ३५ वर्षे वृत्तपत्रे निर्माण झाली नाहीत. त्यामागे तेथील सामाजिक परिस्थिती कारणीभूत ठरली. पुण्यावरील कर्मठ विचारसरणीचा पगडा कमी होऊन आधुनिक शिक्षणाची जाणीव,जागृती निर्माण झाल्यानंतर वृत्तपत्रे उदयास आली. पुण्यातील प्रथम वृत्तपत्राचा मान 'पुना ऑब्झर्वर' (Poona Observer)या वृत्तपत्रास मिळतो. या वृत्तपत्राचा प्रथम अंक शनिवार दिनांक १५ मे १८५२ ला प्रसिद्ध झाला. हे वृत्तपत्र दादाभाई बहिरामजींच्या मालकीचे होते. पुढे १८४९ ला 'ज्ञानप्रकाश' या वृत्तपत्रानंतर वृत्तपत्रसृष्टी बळकट झाली. कृष्णाजी रानडे हे त्याचे पहिले संपादक होते. हे वृत्तपत्र यशस्वीपणे चालून १०३ वर्षानंतर १ जानेवारी १९५१ ला बंद झाले. पुढे ब्रिटीश सत्ता आल्यानंतरपुण्यात सामाजिक अभिसरण घडून आले.'पुणे' विकसित होत असताना राजकीय जाणीवा प्रगल्भ होत गेल्या आणि पुण्यात १८८१ रोजी 'केसरी' व 'मराठा' वृत्तपत्रांचा उदय झाला.या वृत्तपत्रांद्वारे संपूर्ण भारताला दिशा देण्याचे कार्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर अशा लढाऊ संपादकांनी केले.[४]

मराठीतील सर्वप्रथम पाक्षिक वृत्तपत्र म्हणून 'दर्पण'ला ओळखतात.हे वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकरांनी प्रकाशित केले. दर्पणच्या प्रथम अंकावरच 'दर १५ दिवसांनी छापावयाचे पुस्तक, कागद किंमत १/२ महिन्यास ६' असा उल्लेख आहे. दर्पण नंतर मराठी वृत्तपत्रसृष्टीची वाटचाल बदलून गेली. इ.स. १८५० च्या अगोदर ज्ञानोदय, ज्ञानसिंधु, ज्ञानप्रकाश अशी पत्रे मराठीत निघाली. त्यापैकी अहमदनगरला ज्ञानोदय, मुंबईस ज्ञानसिंधु, व पुण्यातील महत्वाचे वृत्तपत्र म्हणून ज्ञानप्रकाश परिचित झाले.[५] मुंबई प्रांतपरत्वे मराठी वृत्तपत्रसृष्टी ही भिन्न- भिन्न स्वरुपात विकसित झाली.

**कोल्हापुरातील वृत्तपत्र आरंभाची पार्श्वभूमी :**

मराठी वृत्तपत्रसृष्टीतील कोल्हापूरच्या वृत्तपत्रांची वैशिष्ट्ये भिन्न आहेत. कोल्हापूरच्या वृत्तपत्रांना लाभलेली 'संस्थांनी राजवटीची परंपरा' आणि 'लोकराजा राजर्षी शाहुंची प्रेरणा' यातून बहरात गेली. कोल्हापूरची संस्थांनी राजवट ही मुख्यत्वे 'एजंट कारकीर्द' म्हणून ओळखली जाते. इ.स. १८६० दरम्यान कोल्हापूरचा एजंट तथा रेसिडेंट कर्नल अँडरसन एक कार्यक्षम अधिकारी होता. कोल्हापूर दरबारच्या संबंधीची कागदपत्रे हीतेव्हा मुंबईतील छापखान्यात छापत. त्यात पैसा, वेळ याचा प्रचंड अपव्यय होत असे. तेव्हा कोल्हापूर दरबारच्या मालकीचा प्रेस असावा अशी कल्पना पुढे आली यातून अँडरसनने अशा प्रेसची निर्मिती केली. या छापखान्यात दरबारी कागदपत्रांची निर्मितीनंतरही मोकळा वेळ राहत असल्याने प्रजेच्या माहितीस एखादे वृत्तपत्र असावे या कल्पनेतून कोल्हापुरातील प्रथम वृत्तपत्र दरबारी मालकीचे 'वर्तमान संग्रह' नावाने इ.स. १८६४ मध्ये सुरु झाले.[६] हीच कोल्हापूरमधील वृत्तपत्राची प्रथम सुरुवात ठरली. समतोल लिखाण हे या पत्राचे वैशिष्ट्य ठरले. पुढे ४ ते ५ वर्षानंतर 'धर्मविचार' आणि 'धर्मसंग्रह' अशी करवीर काशीच्या धार्मिक परंपरेनुसार वर्तमानपत्रे निर्माण झाली.[७]

**राजर्षी शाहूंचा लोककल्याणकारी कारभार :**

कागलचे जहागीरदार व कोल्हापूर संस्थानचे रिजंट जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचे जेष्ठ चिरंजीव यशवंतराव उर्फ बाबासाहेबांचा जन्म २६ जून १८७४ ला झाला. व १७ मार्च १८९४ ला कोल्हापूर गादीवर त्यांचा राज्यभिषेक झाला. त्यावेळी त्यांचे वय अवघे २० वर्षे होते. त्यांनी आपले लक्ष संस्थानातील प्रजाजनांचे दुःख, दारिद्र्य निवारण्याकडे दिले. १८ मार्च १८९४ ला जाहीरनामा काढून लोककल्याणाची ग्वाही दिली. त्यानंतर इ.स. १९२२ ला त्यांच्या मृत्यूपर्यंत शिक्षण, समाजकारण, अर्थकारण, राजकारण, लोककल्याण, सार्वजनिक कामे, कला, साहित्य,बहुजन उद्धाराची चळवळ, मागासलेल्यांना विशेष सोयीसवलती, शिक्षण, उद्योग, व्यापार, दळणवळण अशा अनेक क्षेत्रात कार्यरत राहून 'लोकराजा' व 'राजर्षी' ही पदवी सार्थ ठरविली. देशाच्या सामाजिक सुधारणा क्षेत्राच्या इतिहासात छ.राजर्षी शाहूंचे नाव आदराने घेतले जाते.[८]

**राजर्षी शाहू आणि कोल्हापूरमधील वृत्तपत्रे :**

कोल्हापूरमधील वृत्तपत्रांचा भरभराटीचा काळ म्हणून राजर्षी शाहू सत्तेवर आल्यानंतरचा काळ ओळखला जातो.शाहूंच्या राज्याभिषेक मुहूर्तावर मासिक ग्रंथमाला नियतकालिक आरंभ झाले.प्रा.विजापूरकर यांच्या विनंतीवरून इ.स १८९४ मध्ये ग्रंथमालास ५०० रुपये सहाय्य व भक्कम आधार राजर्षींनी दिला.परंतु विजापूरकरांच्या वृत्तपत्राने शाहू महाराज यांच्याविरोधात लिखाण सुरु केले आणि त्यांच्या सुधारणावादी धोरणांना विरोध सुरु केला. यापासून धडा घेवून बहुजन समाजातील लेखक,संपादक होण्यासाठी राजर्षींनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.[९]

**शाहू महाराजांचे वृत्तपत्र विकासामधील भरीव योगदान :**

शाहू महाराजांना माहित होते कि,वर्तमानपत्रामध्ये समाजाला बदलण्याचे प्रचंड सामर्थ्य असलेने ते केवळ उच्चवर्गाची मक्तेदारी होता कामा नये.समाजातील सर्वसामान्यांनाही त्याचा लाभ व्हावा,अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती.प्रा.विजापूरकर यांनी दरबारी पैशाच्या वापरामधून 'आक्रोश' वृत्तपत्र आरंभ करून दरबारावरच टिका-टिप्पणी सुरु केलेने छत्रपती शाहुंनी बहुजन वर्गामधून वृत्तपत्राचा व्याप समर्थपणे सांभाळणारे तरुण निर्माण झाले पाहिजेत या विचाराने त्यांनी स्वतः मुंबईच्या इंदुप्रकाश दैनिकाच्या कचेरीमध्ये जावून एका तरुणास वृत्तपत्र प्रशिक्षण कार्यास सहाय्य केले.तो तरुण म्हणजे 'विजयी मराठा' साप्ताहिकाचे संपादक श्री भुजंग कृष्णाजी गायकवाड होय.त्यांना वृत्तपत्रविषयक संपूर्ण शिक्षण मिळावे म्हणून स्वतः शाहू महाराज यांनी लक्ष दिले.त्यांच्या दूरदृष्टीने कोल्हापूरमध्ये पुरोगामी वृत्तपत्राची एक चळवळ निर्माण होण्यास प्रेरणा मिळाली.त्यामधून इ.स १९०१ ते इ.स १९२२ या काळात जवळपास विसपेक्षा ज्यादा विषयांवर साप्ताहिके,पाक्षिके निर्माण झाली.आणि समाजातील अनेक जातींच्या लोकांमधून चालवली गेली.[१०]

छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये वृत्तपत्रांना दिलेल्या मुक्त स्वातंत्र्यामुळे अन्य प्रदेशापेक्षा स्वातंत्र्य,निष्पक्षपातीपणे,वस्तुनिष्ठपणे वृत्तपत्रे सुरु होती.

**कोल्हापूरमधील विविध विषयानुरूप वृत्तपत्रे :**

शाहूमहाराज यांच्या कालखंडामध्ये कोल्हापूरात राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक, कृषिविषयक, बौद्धिक असे घटक वृत्तपत्रे हाताळत आणि त्याआधारे समाजजागृती करत. या कालखंडामधील वृत्तपत्रे आणि त्यांचे संपादक यांची यादी पुढीलप्रमाणे :

| अ.क्र | वृत्तपत्र / मासिक / साप्ताहिक | संपादक / मालक / प्रकाशक |
|---|---|---|
| १. | ज्ञानसागर | श्री.मंत्री |
| २. | विद्याविलास | रघुनाथशास्त्री गोखले |
| ३. | हॉस्पिटल असिस्टंट | मिशन प्रेस क्लब |
| ४. | विजयी मराठा | भुजंग कृष्णाजी गायकवाड |
| ५. | विश्वबंधु | बळवंतराव कृष्णराव पिसाळ |
| ६. | धर्मविचार | वासुदेव दादा गोखले |
| ७ | राजाराम मिशन | मिशन प्रेस क्लब |
| ८. | चंद्रोदय | वासूदेव दादा गोखले |
| ९. | प्रगती जिन विजय | आण्णासाहेब लठ्ठे |
| १०. | जैन बोधक | कल्लाप्पा धर्मात्मा निटवे |
| ११. | आचार्य ॲण्ड धर्मविचार | व्यंकटेश नारायण दीक्षित |
| १२. | फिलॉसॉफी ॲन्ड रिलीजन | कृष्णाजी पिसाळ |
| १३. | तरुण मराठा | दिनकरराव शंकरराव जवळकर |
| १४. | गरीबांचा कैवारी | हरी सखाराम तुंगार |
| १५. | आर्यभानू | बळवंतराव कृष्णाजी पिसाळ |
| १६. | भगवा झेंडा | श्रीपती हरिबा काकडे |
| १७. | शिवणकला | राजाराम आत्माराम भोपळे |
| १८. | शाहू विजयी मराठा | दत्तात्रय सखाराम जाधव |
| १९. | हंटर | शिवाजीराव आत्माराम भोपळे |

वरील प्रदीर्घ यादीचा विचार करता कोल्हापूरच्या समृद्ध वृत्तपत्रसृष्टीचा प्रत्यय येतो. ही पत्रे सत्यशोधक समाज, थिऑसॉफीकल प्रचार, दलितोद्धार यासाठी कार्यरत होती.[११]

**राजर्षी शाहूंच्यानंतर वृत्तपत्रांची वाटचाल :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या निधनानंतर त्यांचे लोककल्याणकारी कार्य त्यांचे चिरंजीव छत्रपती राजाराम महाराज यांनी चालू ठेवले.त्यामुळे कोल्हापूर संस्थानामध्ये पुरोगामी वृत्तपत्रांची वाटचाल सुरु राहिली.इ.स १९२४ मध्ये सत्यशोधक समाजाची कोल्हापूर संस्थानामध्ये स्थापना झाली.या सत्यशोधक समाजाचे मुखपत्र 'हंटर' निर्माण होऊन ते माधवराव बागल यांचे वडील खंडेराव बागल चालवत.पुढे माधवराव बागल यांनी 'अखंड भारत' हे स्वतंत्र्यपणे साप्ताहिक सुरु केले.इ.स १९२७ मध्ये कोल्हापूरचे भविष्यातील मुखपत्र असणारे दैनिक 'सत्यवादी' कुपवाड येथे पाक्षिक स्वरुपात आरंभ होऊन नंतर साप्ताहिक स्वरुपात कोल्हापुरात सुरु झाले. पुढे १९५७ नंतर दैनिक स्वरुपात रीतसर प्रारंभ झाला. त्याचवेळी दलीतोद्धारासाठी 'गरुड' या साप्ताहिकास श्री. दादासाहेब शिर्के यांनी आरंभ केला. हे साप्ताहिक १९२६-१९५२ अशी २५ वर्षे प्रकाशित होत होते.[१२] त्याच प्रकारे भालजी पेंढारकरांचे 'उषःकाल', श्री. शेनोलीकरांचे 'विकास' ही साप्ताहिके लोकप्रिय झाली.त्याचप्रमाणे श्री दासराम यांचे 'प्रजा', भाऊसाहेब महांगावकरांचे सेवक, डॉ.बाबुराव घाटगे यांचे झुंजार अशी साप्ताहिके निर्माण झाली.अनेक नियतकालिके,पाक्षिके, मासिके, साप्ताहिके,अर्धवार्षिक मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. गणपतराव जाधव यांनी १९३७ मध्ये साप्ताहिक पुढारी सुरु केले. त्याचेच रुपांतर १ जानेवारी १९३९ रोजी दैनिक स्वरुपात सुरु झाले.[१३]

थोडक्यात कोल्हापूरच्या वृत्तपत्रसृष्टीचा विकास हा राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यकाळानंतर खऱ्या अर्थाने सुरू झाला.राजाराम महाराज यांच्याकाळामध्ये त्याला गती प्राप्त झाली.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आधुनिकीकरणामुळे कोल्हापूरच्या वृत्तपत्रांचा गुणात्मक आणि संख्यात्मक दर्जा उंचावला.

**संदर्भ साधने :**

१) सरकार चंचल,कहाणी वर्तमानपत्राची (अनु.दिनकर गांगले),नॅशनल बूक ट्रस्ट,नवी दिल्ली,१९८९,पृष्ठ क्र.७
२) लेले.रा.के,मराठी वृत्तपत्रांचा इतिहास,कोंटीनेंटल प्रकाशन,२००४ (द्वितीय आवृत्ती),पृष्ठ क्र.२३
३) बागलमाधवराव,जीवनप्रवाह,सिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस कोल्हापूर,१९५४,पृष्ठ क्र ८३
४) पोतदार दत्तो वामन,मराठी गद्याचा इंग्रजी अवतार,,पुणे,पान क्र ३६
५) धारूरकर वि.ल,ग.गो जाधव गौरव ग्रंथ,जन्मशताब्दी प्रकाशन,२००८, पृष्ठ क्र ६८
६) तेलवेकर आनंदराव,कोल्हापूरची वृत्तपत्रसृष्टी,पुढारीकार ग.गो जाधव गौरव ग्रंथ,पृष्ठ क्र ११२७) कित्ता ११३
८) पवार शिरीष,राजर्षी छत्रपती शाहू महाराज : विचार आणि कार्य,सहयाद्री प्रकाशन पुणे २६ जून २०१२, पृष्ठ क्र १५
९) कित्ता १७ १०) उपरोकत ११५ ११) उपरोकत ११६,११७
१२) जोशी.वि.कृ,लेलेरा के,वृत्तपत्राचा इतिहास,(खंड पहिला),युगवानी प्रकाशन,१९८०,पान क्र.३०९
१३) जाधव शिवाजी,पीएच डी प्रबंध,पद्मश्री ग.गो जाधव यांची पत्रकारिता:एक विश्लेषनात्मक अभ्यास,मार्गदर्शक : रत्नाकर पंडित, पृष्ठ क्र ४०